
# ८) पकिण्णानि सुभासितानि

**प्रस्तावना**

सुभासित हा शब्द 'सु' आणि 'भासित' यांनी मिळून बनलेला आहे, ज्याचा अर्थ असा आहे की योग्य दृष्टी ठेवून सांगितलेले, सुंदर भाषेत सांगितले गेलेले वचन. या सुभाषितांमध्ये सुखी आणि आदर्श जीवनाचे विचार तसेच नीतियुक्त आचरणाचा मार्ग सांगणारे विचार अंतर्भूत आहेत. व्यक्तीच्या जीवनामध्ये सम्यक बदल घडवून आणण्याची प्रेरणा या सुभाषितांमधून प्राप्त होते. एखादे महत्त्वपूर्ण, अर्थपूर्ण वचन मर्यादित शब्दांत व्यक्त करण्याचे सामर्थ्य या सुभाषितांमध्ये आहे. तिपिटकामधील धम्मपद, सुत्तनिपात इत्यादी ग्रंथात अशी सुभाषिते विपुल प्रमाणात आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी ते विखुरलेले आहेत. वेगवेगळ्या प्रसंगी तथागतांनी शील-सदाचार यावर आधारीत जे उपदेश सांगितलेले आहेत, त्यांचे संकलन म्हणजे धम्मपद, सुत्तनिपात इत्यादींमधील सुभाषित होत.

प्रस्तुत सुभाषित हे धम्मपदामधील काही गाथांचा संग्रह आहे. या गाथांमधून अहिंसा, शांती, बंधुता, समानता, मानवी मूल्ये इत्यादींचा उपदेश सांगितलेला आहे. मानवी समाजाच्या हिताकरिता, सुखाकरिता, कल्याणाकरिता या सुभाषितांमधील गाथा महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी आहेत.

**''जात, धर्म, पंथ, लिंग, प्रदेश, भाषा या भेदाच्या पलिकडे जावून समाजातील सर्व लोकांत सामंजस्य व नैतिक मूल्ये वाढीस लावण्यासाठी सुभाषितांचे महत्त्व आहे.''**



सुभानुपस्सिं विहरन्तं, इन्दियेसु असंवुतं।
भोजनम्हि अमत्तञ्ञुं, कुसीतं हीनवीरियं।
तं वे पसहति मारो वातो रुक्खं व दुब्बलं।।१।। (यमक वग्गो)

असुभानुपस्सिं विहरन्तं, इन्दियेसु असंवुतं।
भोजनम्हि च मत्तञ्ञुं,सद्धं आरध्दवीरियं।
तं वे नप्पसहति मारो, वातो सेलं व पब्बतं।।२।। (यमक वग्गो)

उट्ठानवतो सतिमतो, सुचिकम्मस्स निसम्मकारिनो।
सञ्ञतस्स च धम्मजीविनो, अप्पमत्तस्स यसोभिवड्ढति।।३।। (अप्पमादवग्गो)

कुम्भपमं कायमिमं विदित्वा, नगरूपमं चित्तमदं ठपेत्वा।
योधेय मारं पञ्ञायुधेन, जितं च रक्खे अनिवेसनो सिया।।४।। (चित्तवग्गो)

न परेसं विलोमानि, न परेसं कताकतं।
अत्तनो व अवेक्खेय्य, कतानि अकतानि च।।५।। (पुप्फवग्गो)

यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं अगन्धकं।
एवं सुभासिता वाचा,अफला होति अकुब्बतो।।६।। (पुप्फवग्गो)

यावजीवम्पि चे बालो, पण्डितं पयिरुपासति।
न सो धम्मं विजानाति, दब्बी सूपरसं यथा।।७।।(बालवग्गो)

मुहूत्तमपि चे विञ्ञू, पण्डितं पयिरुपासति।
खिप्पं धम्मं विजानाति, जिव्हा सूपरसं यथा।।८।। (बालवग्गो)

सेलो यथा एकघनो, वातेन न समीरति।
एवं निन्दापसंसासु, न समिज्जन्ति पण्डिता।।९।। (पण्डितवग्गो)

सहस्समपि चे वाचा,अनत्थपदसंहिता।
एकं अत्थपदं सेय्यो, यं सुत्वा उपसम्मति।।१०।। (सहस्सवग्गो)

अलङ्कतो चे पि समं चरेय्य, सन्तोदन्तो नियतो ब्रह्मचारी।
सब्बेसु भूतेसु निधाय दण्डं, सो ब्राह्मणो सो समणो च भिक्खू।।११।। (दण्डवग्गो)

अत्तना व कतं पापं, अत्तना सङ्किलिस्सति।
अत्तना अकतं पापं, अत्तना व विसुज्झति।
सुध्दि असुध्दि पच्चतं, नाञ्ञो अञ्ञं विसोधये।।१२।। (अत्तवग्गो)

ये झाणपसुता धीरा, नेक्खम्मूपसमे रता।
देवापि तेसं पिहयन्ति, सम्बुध्दानं सतीमतं।।१३।। (बुद्धवग्गो)

यो दुक्खस्स पजानाति, इधेव खयमत्तनो।
पन्नभारं विसञ्ञुतं, तमहं बुमि ब्राह्मणं।।१४।। (ब्राह्मणवग्गो)

**(संदर्भ–धम्मपद)**

## शब्दार्थ

**सुभ (नपु.)–** शुभ,चांगले
**अनुपस्सति(वर्त.क्रि.)–** पाहतो, विचार करतो
**सुभानुपस्सि (वि.) –** चांगले माणून चालणारा
**इन्द्रिय (नपु.)–** इंद्रिय
**संवुत– (वि.)** संयमी
**असंवुतं (वि.)–** असंयमी
**मत्तञ्ञू (वि.)–** प्रमाण जाणणारा, मात्रा जाणाणारा
**अमत्तञ्ञू (वि.)–** प्रमाण न जाणणारा
**कुसीतं (नपुं.)–** आळशी
**विरिय (नपु.)–** सामर्थ्य, उत्साह
**हीनवीरिय (वि.) –** उत्साहरहित
**तं (सर्व.)–** त्याला

**वे (अ.)**– खरोखर, निश्चितपणे
**पसहति (वर्त.क्रि.)**– दडपून टाकतो
**मार (पु.)**– मार, मनातील दृष्ट प्रवृत्ती
**वात (पु.)**– वारा
**दुब्बलं (वि.)**– दुर्बल
**पब्बतं (पु.)**– पर्वत
**उट्ठानवतो (वि.)**– उत्साहवान
**सुचि (नपु.)**– पवित्र
**निसम्म(पूर्व.क्रि.)**– विचार करून
**निसम्मकारिनो (वि.)**– विवेकाने आचरण करणारा
**काय (पु.)**– काया, शरीर
**कुम्भ (पु.)**– घडा
**उपम (वि.)**– समान/उपमा
**विदित्वा (पूर्व.क्रि.)**– जाणून
**ठपेत्वा (पूर्व.क्रि.)**– ठेवून
**निवेसन (नपु.)**– घर, निवास
**पर(वि.)**– दुसरा
**विलोम (नपुं.)**– विरूद्ध
**विलोम(नपु.)**– दोष
**कताकतं(नपु.)**–केलेले, न केलेले
**अवेक्खति (क्रि.)** – पाहतो, विचारात घेतो, अवलोकन करतो
**रुचिरं (वि.)**– सुंदर
**वण्णवन्तं (वि.)**– रंग असणारे
**गन्धकं (वि.)**– वास असणारे
**कुब्बतो ( वि.)**– आचरण करणारा
**यावजीवम्पि (स्त्री.)**– जीवनभर सुद्धा
**पयिरुपासति (वर्त.क्रि)**– जवळ बसतो, सेवा करतो
**दब्बी (स्त्री.)**– पळी, चमचा
**सुप(पु.)**– स्वाद, रस्सा, आमटी, कढी
**विञ्ञू(वि.)**– सूज्ञ, पंडित,विद्वान
**मुहुत्त(पु.नपुं.)**– थोडा वेळ,क्षण
**खिप्प (वि.)**– चटकन, शीघ्र, तत्काळ
**समीरति (वर्त.क्रि)**– हलतो
**समिञ्जति (वर्त.क्रि)**– विचलित होतो, हलतो
**अत्थ (पु.)**– अर्थ, लाभ, धन
**अनत्थ (अन+अत्थ)**– अनर्थ, हानी
**अत्थपदं(नपु.)**– अर्थपूर्ण वचन
**सेय्यो (वि.)**– श्रेष्ठ
**सुत्वा (पूर्व.क्रि.)**– ऐकून
**अलङ्कतो(वि.)**– अलंकृत, सजवलेला
**सन्त(वि.)**– शांत
**नियत(वि.)**– स्थिर
**दन्त(वि.)**– दमन केलेला, संयत
**निधाय(पूर्व.क्रि.)**– सोडून
**सुद्धि(स्त्री)**– शुद्धी, पवित्रता
**पच्चत्तं (वि.)**– वेगवेगळे
**विसोधये(कृ.)**– शुध्द करणे योग्य
**झान(नपु.)**– ध्यान
**पसुत(पूर्व.वि.)**– मग्न राहून, लागून राहून
**नेक्खम्मूपसमे(पु.)**– परमशांत निर्वाण
**रत(कृ.)**– अनुरक्त आनंद घेणारा
**पिहयन्ति (वर्त.क्रि.)**– इच्छा करतो, प्रयत्न करतो
**खय (पु.)**– क्षय
**पन्नभारं (वि.)**– ओझे उतरून ठेवलेला
**विसत्तं (वि.)**– आसक्त

## स्वाध्याय

**१. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) आळशी आणि उद्योगहिन माणसाला मार कसा हाणून पाडतो?
२) मनुष्याची यशवृध्दी कशी होते?
३) स्वतःचे अवलोकन कसे करावे?
४) शरीरास कसे समजावे?
५) माराशी युद्ध कसे करावे?
६) शहाणा माणूस धर्माला कसे जाणून घेतो?
७) 'निन्दापसंसा' या शब्दाचा अर्थ सांगा?

## २. खालील वाक्ये सत्य/असत्य ओळखा.

१) सुभानुपस्सि विहरन्तं, इन्दियेसु सुसंवुतं।

२) असुभानुपस्सि विहरन्तं, इन्दियेसु सुसंवुतं।

३) न परेसं विलामनि, न परेसं कताकतं।

४) यथापि रुचिरं पुप्फं, वण्णवन्तं सुगन्धकं।

५) सेलो तथा एकघनो, वातेन न समीरति।

## ३. सूचनेनुसार कृती करून उत्तरे लिहा.

१) यावजीव (समास ओळखा)

२) सु (पूर्वकालवाचक अव्यय करा.)

३) दुक्खस्स (विभक्ती ओळखा.)

४) 'इन्द्रियेसु सुसंवुतं'(माध्यम भाषेत अर्थ लिहा)

५) तं वे नप्पसहति मारो,...........।
(गाथा पूर्ण करा.)

६) यथापि रुचिरं पुप्फ वण्णवन्तं गन्धक।
(गाथा दुरुस्त करुन लिहा.)

७) अचूक पालि शब्द ओळखून पुन्हा लिहा.
अ) यावजीवम्पि/ याविजीवम्पि/ याविजींवपि
ब) महत्तमपि/ मुहूत्तमपि/ महुतमपी
क) विसुध्दति/ विसुज्झती/ विसुज्झति

## ४. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१) भोजनम्हि ..........., कुसीतं हीनवीरियं।
(अमत्तञ्ञुं/मत्तञ्ञुं)

२) योधेय मारं पञ्ञायुधेन, जितं च रक्खे ...........
सिया। (निवेसनो/अनिवेसनो)

३) अत्तनो व ..........., कतानि अकतानिच।
(अवेक्खय्य/वेक्खेय)

४) सहस्समपि च वाचा, ...........।
(अत्थपदसंहिता /अनत्थपदसंहिता)


५) यो...........पजानाति, इधेव खयमत्तनो।
(दुक्खस्स/सुखस्स)

## ५. योग्य जोड्या लावा.


| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १) यावजीवम्पि चे बालो | अ) वातेन न समीरति। |
| २) सेलो यथा एकघनो | ब) कतानि अकतानि च। |
| ३) अत्तनो व अवेक्खेय्य | क) तमहं ब्रुमि बाह्मणं। |
| | ड) पण्डितं पयिरुपासति। |

## ६. खालील गाथांच्या आधारे जाळरेखाचित्र पूर्ण करा.

१) उट्ठानवतो सतिमतो, सूचिकम्मस्स निसम्मकारिनो।
सञ्ञतस्स च धम्मजीविनो, अप्पमत्तस्स
यसोभिवड्ढति।




२) यो दुक्खस्स पजानाति, इधेव खयमत्तनो।
पन्नभारं विसंञ्ञुतं, तमहं ब्रुमि ब्राह्मणं।।




## ७. दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) 'धम्मजीविनो' (धम्माप्रमाणे चरितार्थ चालविणारा) विषयी लिहा

२) पालि साहित्यामधील मार संकल्पना स्पष्ट करा.

३) 'पकिण्णानि सुभासितानि' चा सारांश लिहा.

☆☆☆